CMYK

**तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांना त्रास** >>पान 2

**शेतकऱ्यांना भरघोस मदत करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा; केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची माहिती** >>पान 3

**शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देणार** >>पान 4

**सुविचार**

यशाचा खरा अर्थ समजून घ्या.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 287 ■ रविवार, दि. 29 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



**नवाजुद्दीन सिद्दीकीला आय एम नॉट ॲन ॲक्टरसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा मिळाला पुरस्कार**

आतील पान

# ठाकरे बंधू एकत्र मोर्चा काढणार

## ५ जुलैचा मोर्चा यशस्वी अन् भव्य करण्यासाठी दिली जबाबदारी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : हिंदीच्या मुद्द्याविरोधात ठाकरेंची शिवसेना ठाकरे गट आणि मनसे या दोन्ही पक्षाचा एकत्र मोर्चा ५ जुलैला आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्रित मोर्चा काढणार आहेत. या मोर्चाच्या तयारीला आता वेग आला आहे. मोर्चाचा मार्ग त्यासोबतच मोर्चाची वेळ यासंबंधी निर्णय लवकरच होणार आहे.**



मोर्चा यशस्वी करण्यासाठी दोन्ही नेत्यांच्या चर्चा भेटीगाठी आता सुरू झाल्या आहेत. यानंतर आता दोन्ही पक्षांच्या काही नेत्यांवर या मोर्चाच्या नियोजनाची जबाबदारी सोपवण्यात आली.

ठाकरेंची शिवसेना आणि मनसे दोन्ही पक्षाकडून पाच जुलैचा मोर्चा यशस्वी आणि भव्य करण्यासाठी तयारी सुरू करण्यात आली आहे. मुंबईतील विविध विभागात पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन मोर्चाची रणनीती दोन्ही पक्षाकडून ठरवली जाणार आहे. मनसेकडून संदीप देशपांडे, बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, तर ठाकरेंच्या शिवसेनेकडून संजय राऊत, वरुण सरदेसाई, व इतर काही नेते नियोजनाची आणि तयारीची जबाबदारी देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मोर्चाची वेळ आणि आझाद मैदानावरील मोर्चाचा मार्ग यासंबंधी चर्चा दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये सुरू आहे.

हिंदीसक्ती आणि त्रिभाषा सूत्राच्या विरोधातील उद्याची मुंबईतील सभा आणि या शासन निर्णयाची होळी करून निषेध करण्याला सध्या प्राधान्य दिला आहे. उद्या (२९ जून) मुंबईतील विविध विभागांमध्ये त्रिभाषा सूत्राच्या सक्तीच्या शासन निर्णयाची होळी दुपारी ठिकठिकाणी करून निषेध व्यक्त केला जाणार आहे. दादरमधील प्रबोधनकार ठाकरे चौक येथे तर बांद्राच्या >>पान २

# भाजपला मिळणार नवा प्रदेशाध्यक्ष!

## चंद्रशेखर बावनकुळेंच्या जागी रविंद्र चव्हाणांची नियुक्ती होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य भाजप कार्यकारिणीमधील उत्सुकता अखेर संपली असून भाजपला मिळणार नवा प्रदेशाध्यक्ष मिळणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्षपदी रविंद्र चव्हाण यांची नियुक्ती होणार आहे. रविंद्र चव्हाण प्रदेशाध्यक्षपदासाठी ३० जूनला अर्ज भरणार आहेत. १ जुलैला नियुक्ती जाहीर केली जाणार आहे. वरळी डोम येथे एक जुलैला सकाळी ११ वाजता अधिकृत घोषणा होणार आहे. यावेळी भाजपचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्याच्या दिशेने पाऊल टाकत, भाजपने शुक्रवारी महाराष्ट्र, उत्तराखंड आणि पश्रि्चम बंगालमधील संघटनात्मक निवडणुकांवर देखरेख करण्यासाठी दोन केंद्रीय मंत्री आणि एक माजी केंद्रीय आणि विद्यमान खासदार यांची राज्य निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केली. या निवडणुका पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या बहुप्रतिक्षित निवडणुकीची पूर्वसूचना आहेत.

भाजप ओबीसी मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि पक्षाचे राष्ट्रीय निवडणूक अधिकारी (एनईओ) डॉ. के. लक्ष्मण यांनी केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू आणि हर्ष मल्होत्रा आणि माजी केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांची महाराष्ट्र, उत्तराखंड आणि पश्रि्चम बंगालचे राज्य निवडणूक अधिकारी म्हणून



अनुक्रमे नियुक्ती केली आहे. ते राज्य पक्षाध्यक्षांच्या निवडणुकीचे तसेच राष्ट्रीय परिषद सदस्यांच्या निवडणुकीचे पर्यवेक्षण करतील. राष्ट्रीय निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून गुजरात, उत्तराखंड, तेलंगणा, त्रिपुरा, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि इतर अनेक राज्यांमध्ये प्रदेश अध्यक्षांची नियुक्ती झाल्यानंतर, पक्ष १५ जुलैपर्यंत >>पान २

# हिंदी सक्तीबाबत बोलताना शिक्षणमंत्र्यांना एकनाथ शिंदेंचा फोन, दादा भुसे जागेवरून उठले अन्...



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात मराठी विरुद्ध हिंदी असा वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. पहिली ते चौथीच्या वर्गांमध्ये, हिंदी ही तिसरी भाषा म्हणून सक्तीने शिकवण्याचा सरकारचा मानस आहे. या पार्श्र्वभूमीवर येत्या ५ जुलै रोजी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे संयुक्तपणे मोर्चा काढणार आहेत. आता हिंदी सक्तीच्या निर्णयावर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. नाशिकमध्ये पत्रकार परिषद घेत दादा भुसे यांनी हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर भाष्य केले. तर दादा भुसे यांची पत्रकार परिषद सुरु असतानाच त्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा फोन आल्याने चर्चांना उधाण आले आहे.

दादा भुसे पत्रकार परिषदेत म्हणाले की, राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार वेळोवेळी कागदपत्रे, आकडेवारी, पाठीमागचा प्रवास याची माहिती दिली आहे. मराठी आपली मातृभाषा, राज्यभाषा आणि मोदींच्या मार्गदर्शनाखाली मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. ही अभिमानाची गोष्ट आहे. सर्व माध्यमांच्या शाळेत मराठी शिकवणे बंधनकारक केले आहे. मागील दीड महिन्यापूर्वी मागणी करण्यात आली होती. सीबीएसई माध्यमाच्या शाळांमध्ये देशापातळीवर त्या त्या राज्याच्या भाषा शिकवणे बंधनकारक केले आहे, असे त्यांनी म्हटले.

# छत्रपती संभाजी नगरमध्ये एसटीच्या जागेवर उभे राहणार महाराष्ट्रातील सर्वात मोठे सर्वात मोठे भंगार केंद्र

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील सर्वात मोठे भंगार केंद्र एसटीच्या जागेवर उभारले जाणार आहे. एसटीसाठी उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे असलेल्या एसटी महामंडळाच्या



१०० एकर जागेवर सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून उभारले जाणार आहे.

जुनी वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्याचे सुटे भाग पुन:श्च वापरात येणार नाहीत, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावणारे सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर (भंगार केंद्र) एसटी महामंडळ सार्वजनिक- खाजगी भागीदारी तत्त्वावर उभारले जाईल. एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाच्या आढावा बैठकीमध्ये ही घोषणा करण्यात आली.

केंद्र शासनाद्वारे २०२१ मध्ये रजिस्टर व्हेईकल स्क्रॅपिंग फॅसिलिटी नावाने १५ वर्षापेक्षा जुनी वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप >>पान २

# ११ वी प्रवेशाची पहिली यादी जाहीर; विद्यार्थ्यांनो, ७ जुलैपर्यंत प्रवेश घ्या

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील अकरावीच्या विद्यार्थ्यांना उत्सुकता लागलेल्या ११ वी प्रवेशाची यादी दोन दिवसांआधीच जाहीर झाली आहे. विशेष म्हणजे ११ वी प्रवेशाची पहिली यादी ३० जूनला जाहीर होणार होती, पण पहिली गुणवत्ता यादी आजच शिक्षण संचालनालयाकडून जाहीर करण्यात आली आहे. जवळपास मागील दीड महिन्यापासून दहावी उत्तीर्ण



विद्यार्थी अकरावी प्रवेशाची वाट पाहत होते. राज्यातील १२ लाख ७१ हजार विद्यार्थ्यांनी यंदा अकरावीत कॉलेजसाठी ऑनलाइन प्रवेशासाठी नोंदणी केली आहे. दरम्यान, विद्यार्थी व पालकांना https://mahafyjcadmissions.in या वेबसाईटवर प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी पाहता येणार आहे.

सरकारने जाहीर केलेल्या यादीनुसार ३० जून ते ७ जुलै दरम्यानच्या कालावधीत पहिल्या गुणवत्ता यादीमध्ये कॉलेज मिळालेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये जाऊन आपला प्रवेश निश्र्चित करायचा आहे. संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करुन पारदर्शक व निकोप पध्दतीने प्रवेश प्रक्रिया होण्यासाठी पहिली गुणवत्ता यादी आता ३० जून रोजी जाहीर होणार असल्याचे सांगण्यात आले होते. >>पान २

# बेलवाडीत तुकोबारायांच्या अश्वाचे पहिले गोल रिंगण थाटात



संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यातील मानाच्या अश्वाचं पहिलं गोल रिंगण बेलवाडी इथं अत्यंत उत्साही वातावरणात पार पडलं. यावेळी हजारो वाकऱ्यांनी आनंद साजरा केला.

# हभप नारायण महाराज तराळे यांचे निधन

## ६० वर्षे केली पंढरीची वारी, ९८ व्या वर्षी अखरेचा श्वास

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अवघ्या महाराष्ट्राला पंढरीच्या वारीचे वेध लागले असून लाडक्या विठुरायाच्या भेटीसाठी शेकडो दिंड्या पंढरीकडे चालत आहेत. पाऊले चालती पंढरीची वाट म्हणत ऊन, पाऊस अन् वाऱ्यातही माऊली.. माऊली... नाम जपत वारकऱ्यांची पाऊले पंढरपूरकडे जात आहेत. गावखेड्यातील वारकरी, महाराज, हभप आणि साधू-संताकडूनही वारीच्या आठवणी



जागवल्या जात आहेत. मात्र, अकोला जिल्ह्यातून एक दु:खद वार्ता समोर आली आहे. जिल्ह्यातील वारकरी संप्रदायातील जेष्ठ संत हभप नारायण महाराज तराळे यांचं आज वृद्धापकाळाने निधन झालं, मृत्यूसमयी ते ९८ वर्षांचे होते.

हभप नारायण महाराज तराळे यांनी बाळापूर तालुक्यातल्या व्याळा >>पान २

# आता एसीचे तापमान २० अंशांपेक्षा कमी करता येणार नाही!

**नवी दिल्ली : केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी एअर कंडिशनर (एसी) चे तापमान २० ते २८ अंश सेल्सिअस पर्यंत मर्यादित ठेवण्याची योजना लवकरच अंमलात येण्याची शक्यता नाही, कालांतराने हळूहळू अंमलात आणली जाईल, असे म्हटले आहे. इंडिया क्लायमेट समिट (आयसीएस) २०२५ मध्ये एसी तापमानाची नवीन मर्यादा कधी लागू केली जाईल असे विचारले असता, यादव म्हणाले की अशी कोणतीही परिस्थिती २०५० नंतरच उद्भवू शकते. ते म्हणाले, मला वाटत नाही की ते लगेच होईल, कालांतराने हळूहळू त्यासाठी क्षमता निर्माण केल्या जातील.**

## कायदा करण्याबाबत केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांचे मोठे विधान



केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव म्हणाले, हवामान उद्दिष्टे साध्य करणे राष्ट्रीय परिस्थिती आणि सीबीडीआर-आरसी (सामान्य परंतु भिन्न जबाबदाऱ्या आणि संबंधित क्षमता) तत्त्वानुसार केले पाहिजे. ते म्हणाले, भारताचा राष्ट्रीयरित्या निर्धारित योगदान (एनडीसी) किंवा राष्ट्रीय हवामान योजना, जो संयुक्त राष्ट्रांच्या हवामान संस्थेला सादर करण्यात आला आहे, तो आपल्या लोकांना ऊर्जा उपलब्धता सुनिश्र्चित करण्यावर भर देतो. सीबीडीआर-आरसीच्या तत्त्वाचा अर्थ असा आहे की सर्व देशांना हवामान बदलाशी लढावे लागेल, परंतु विकसित देशांनी अधिक प्रयत्न केले पाहिजेत, कारण ऐतिहासिकदृष्ट्या ते उत्सर्जनासाठी अधिक जबाबदार आहेत आणि त्यांच्याकडे अधिक संसाधने आहेत.

या महिन्यात, केंद्रीय मंत्री मनोहर लाल म्हणाले होते की भारतातील एअर कंडिशनर लवकरच २० अंश सेल्सिअस ते २८ अंश सेल्सिअसच्या मर्यादेत काम करतील आणि ते अनिवार्य केले जाईल. त्यांनी म्हटले होते की या मर्यादेपेक्षा कमी किंवा त्याहून अधिक तापमानात काम करण्यास मनाई असेल.

ऊर्जा कार्यक्षमता ब्युरो (बीईई) नुसार, भारतातील बहुतेक एसी सध्या २० ते २१ अंश सेल्सिअसच्या दरम्यान सेट केले जातात, जरी आदर्श आरामदायी श्रेणी २४ ते २५ अंश सेल्सिअस आहे. आराम आणि ऊर्जेच्या वापरामध्ये संतुलन राखण्यासाठी इएए ने एअर कंडिशनर २४ ते २५ अंश सेल्सिअसवर सेट करण्याचा सल्ला दिला आहे.

CMYK

## उत्पादन क्षेत्रात महिला कर्मचाऱ्यांची भरारी

अंगणवाडीपासून ते अगदी अंतराळ क्षेत्रापर्यंत महिलांसाठी आता कोणतेही क्षेत्र अस्पर्शित नाहीच. याला उत्पादन क्षेत्रही कसे अपवाद राहील म्हणा. वर्षानुवर्षे पुरुषांची एकहाती मक्तेदारी असणार्या उत्पादन क्षेत्रातही हल्ली महिला अग्रक्रमाने कार्यरत असून, त्यांनीही आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे. त्यानिमित्ताने उत्पादन क्षेत्रातील महिला कर्मचार्यांच्या कार्यभरारीविषयी... ऐतिहासिक संदर्भात व परंपरागतरित्या उत्पादन क्षेत्र हे पुरुष उमेदवारांचा प्रभाव आणि वर्चस्व असणारे समजले जात असे. मात्र, बदलती परिस्थिती, उपलब्ध कौशल्यप्राप्त कर्मचार्यांचे प्रमाण व त्यांची टक्केवारी व व्यावसायिक स्पर्धेसह कौशल्य असणार्या कर्मचार्यांच्या उपलब्धतेसाठी विविध कंपन्यांनी, विविध पुढाकारांसह गेल्या काही वर्षांत प्रयत्न सुरू केले असून, त्यांचे दृष्य परिणाम असता दिसू लागले आहेत. भारतीय उत्पादन कंपन्यांमध्ये आघाडीवर असणार्या व मोठ्या संख्येत कर्मचार्यांची नेमणूक करणार्या 'लार्सन ॲण्ड टुब्रो', 'टाटा स्टील', 'महिंद्र उद्योग समूह', 'सिएट टायर्स' व 'हनीवेल' या आणि यांसारख्या अन्य मोठ्या कंपन्यांनी आपल्या कंपन्यांमध्ये महिला कर्मचार्यांची संख्या वाढविण्यासाठी काही धोरणात्मक निर्णय घेऊन विशेष प्रयत्न सुरू ठेवले आहेत.

वानगीदाखल सांगायचे झाल्यास, वरील कंपन्यांसह विविध कंपन्यांनी त्यांच्याकडे सध्या असणार्या महिला कर्मचार्यांची संख्या कायम ठेवत असतानाच, बदलती स्थिती, गरजा आणि व्यावसायिक–कामकाज या सार्याला पूरक अशी भूमिका घेऊन महिला कर्मचार्यांची संख्या वाढविण्यावर भर देण्यास सुरुवात केली आहे.यामध्ये प्रामुख्याने महिला कर्मचार्यांच्या तान्ह्या वा लहान मुलांसाठी पाळणाघर व अशा लहान मुलांची कामाच्या ठिकाणी काळजी घेण्यासाठी आवश्यक त्या सुविधा व कर्मचारी ठेवणे, महिला कर्मचार्यांसाठी लवचिक व सोयीस्कर कामाचे तास ठेवणे, यासंदर्भातील गरजू महिलांना बाळांचे आरोग्य, संगोपन, बालकांचे खानपान, स्वतःसह बाळांची निगा राखणे इत्यादींसाठी आवश्यक ते मार्गदर्शन व सल्ला उपलब्ध करून दिला जातो, हे यासंदर्भात उल्लेखनीय.या कंपन्यांमध्ये काम करणार्या महिलांच्या सोयीसाठी तेथील महिला कर्मचार्यांना अधिक प्रमाण वा संख्येमध्ये घेण्यासाठी नव्या कर्मचार्यांची निवड करताना शैक्षणिक पात्रता व योग्यतेवर आधारित स्वरूपात महिला उमेदवारांना प्राधान्य देण्यावर भर दिला आहे. याशिवाय कंपनीत उपलब्ध असणार्या जागांसाठी पात्रताधारक उमेदवारांचे अर्ज व माहिती कंपनी व्यवस्थापनाकडे पाठविताना त्यात योग्य व पात्रताधारक महिला उमेदवाराची निवड झाल्यास अशा उमेदवाराचा संदर्भ देणार्या कंपनी उमेदवाराला विशेष प्रोत्साहनपर राशी देण्यास सुरुवात केली आहे. कंपन्यांच्या या आणि अशा प्रकारच्या प्रगतिशील धोरणांमुळे या कंपन्यांमधील महिला कर्मचार्यांची संख्या निश्चितपणे वाढत आहे. सुरुवातीलाच नमूद केलेल्या कंपन्यांपैकी उत्पादन उद्योगातील प्रमुख अशा 'लार्सन ॲण्ड टुब्रो' यासारख्या उत्पादन, प्रकल्प व्यवस्थापन, उद्योग–सेवा व संगणक क्षेत्रातील उद्योगांमध्ये मोठ्या संख्येत काम करणार्या कर्मचार्यांमध्ये महिला कर्मचार्यांची संख्या वाढविण्यासाठी गेली काही वर्षे ठरवून व योजनापूर्वक प्रयत्न केले आहेत. यासंदर्भात कंपनीच्या अध्यक्षांकडून घोषित करण्यात आलेले धोरणात्मक निर्णय व त्यांच्या अंमलबजावणीचा समावेश आहे. यामध्ये महिला कर्मचार्यांच्या विविध वेळी व विविध प्रकारच्या गरजा लक्षात घेऊन कंपनीने आपली धोरणे आखली आहेत. यामध्ये संबंधित गरजू महिला कर्मचार्यांना त्यांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन त्यांना विशेष कालावधीसाठी कंपनी व्यवस्थापनातर्फे विशेष सहकार्य दिले जाते. या भूमिकेचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. 'लार्सन ॲण्ड टुब्रो'सारख्या कंपन्या महिला कर्मचार्यांना तान्ह्या मुलांना घेऊन अशा कर्मचार्यांच्या कामावर ये–जा करण्यासाठी सहानुभूती व विशेष सहकार्याची भूमिका घेतात. यात एक विशेष बाब म्हणून अगदीच तान्ह्या बालकांना ठराविक काळात सोबत म्हणून त्यांच्या रोजच्या व घरगुती आयांना कंपनी वाहनात संबंधित महिला कर्मचार्यांसह प्रवास करण्याची परवानगी दिली जाते. याशिवाय कंपनीतर्फे विविध ठिकाणी स्थापन केलेल्या महिला कर्मचारी कल्याण केंद्रांच्या माध्यमातून महिला कर्मचार्यांचा सर्वांगीण विकास, त्यांच्या सर्वसाधारण वा विशेष गरजा वैद्यकीय सल्ला, आर्थिक साक्षरता व गुंतवणूक विषयक सल्ला–मार्गदर्शऩ इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. 'एलॲण्डटी'चे मुख्य मानव संसाधन विकास व्यवस्थापक सी. जयकुमार यांच्या मते, 'एलॲण्डटी' उद्योग समूहाच्या लक्षणीय स्वरूपात असल्याचे त्यांच्या विविध टप्प्यातील छोट्या–मोठ्या गरजांची पूर्तता करण्याचे प्रयत्न केले जातात व अशा प्रयत्नांचे फायदे महिला कर्मचारी व कंपनी व्यवस्थापन या उभयतांना होतात. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'लार्सन ॲण्ड टुब्रो'मधील सुमारे ४३ टक्के महिला कर्मचारी त्यांच्या कामाच्या ठिकाणी व गरजेनुसार कंपनीच्या बालसंगोपन गृहांचा लाभ घेतात. इतर प्रमुख कंपन्यांच्या संदर्भात सांगायचे झाल्यास 'आर. पी. गोएंका' उद्योग समूहांतर्गत महिला कर्मचार्यांसाठी 'शक्ती' या विशेष उपक्रमांतर्गत विविध धोरणात्मक उपाययोजना आखल्या आहेत.

# तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांना त्रास

## अर्ज स्वीकारण्याची वेळ वाढवून नागरिकांचे कामे वेळेत करण्याची सामाजिक कार्यकर्त्यांची मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**मालेगाव/प्रतिनिधी :** शालेय कामकाजासाठी विविध दाखले अनिवार्य करण्यात आल्याने तालुक्यातील पालक व इतर महत्त्वाच्या कामासाठी नागरिक तहसील कार्यालयात विविध कागदपत्र मिळवण्यासाठी अर्ज करत आहेत. मात्र, अर्ज करण्याचा कालावधी कमी असल्याने व कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभाराने पालकांना तसेच इतर नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन अर्ज स्वीकारण्याची वेळ वाढवून द्यावी त्याचबरोबर नागरिकांना उभे राहण्यासाठी या ठिकाणी सुविधा करावी आणि वेळेच्या आत तात्काळ नागरिकांची कामे मार्गी लावाव, यासाठी मनसे तालुका उपाध्यक्ष रामेश्वर वाघ, शिवसेना माजी तालुकाप्रमुख भास्करराव देशमुख, मनसे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी, सामाजिक कार्यकर्ते अनिल जाधव यांनी नायब तहसीलदार करंगळे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे मागणी केली.

शालेय सत्र सुरू झाल्याने व शिक्षण विभागाच्या नवीन नियमानुसार विविध दाखले अनिवार्य करण्यात आले आहेत. त्यामुळे पालक जुने कागदपत्र जमा करण्यासाठी तहसील कार्यालयात गर्दी करत आहेत. कोतवाल बुक नक्कल, फेरफार यास इतर महत्त्वाचे जुने कागदपत्र मिळवण्यासाठी अर्ज करण्यात येत आहेत. मात्र, तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभाराने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. अर्ज करण्याचा कालावधी कमी असल्याने व त्यानंतर पाच मिनिटांचा वेळ झाल्यानंतरही अर्ज स्वीकारले जात नसल्याने तालुक्यातून येणाऱ्या नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांची नागरिकांना सहकार्याची भूमिका न ठेवता अडेल तट्टूपणा केला जात आहे.

परिणामी, नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. शुक्रवारी तहसील कार्यालयामध्ये असाच प्रकार घडला. त्यानंतर मनसे पदाधिकारी तसेच शिवसेना पदाधिकाऱ्यांनी नायब तहसीलदार करंगळी यांची भेट घेत त्यांना सर्व आपबिती सांगितली. त्यानंतर नायब तहसीलदार करंगळे यांनी संबंधीत कर्मचाऱ्यांना अर्ज स्वीकारण्याचे आदेश देऊन काम वेळेत करून देण्याचे निर्देश दिले. त्यामुळे नागरिकांची समस्या निकाली निघाली. मात्र, प्रत्येक वेळेस वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जाऊन कर्मचाऱ्यांची तक्रार करावी का असा प्रश्नही नागरिकांनी उपस्थित करत येथील कर्मचाऱ्यांनी नागरिकांना सहकार्याची भूमिका ठेवून आणि शिक्षणात शैक्षणिक महत्त्व समजून त्यांना पालकांना वेळेत कागदपत्र उपलब्ध करून देण्याची यावी, अशी मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात आली.

येथील कर्मचाऱ्यांकडून दिव्यांग नागरिकांचा सुद्धा सन्मान करण्यात येत नसल्याचा प्रकार समोर आला आहे. शिरपूर येथील एका अपंग महिलेला गत चार दिवसापासून तहसील कार्यालयात चकरा माराव्या लागत असून त्यानंतरही कागदपत्र मिळत नसल्याने त सदर महिलेला प्रचंड त्रास सहन करावा लागला.



त्यानंतर या ठिकाणी मनसे तालुका उपाध्यक्ष रामेश्वर वाघ, शिवसेना माजी तालुकाप्रमुख भास्करराव देशमुख, मनसे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी, सामाजिक कार्यकर्ते अनिल जाधव यांच्यासह इतरांनी पुढाकार घेत सदर महिलेचे काम मार्गी लावून देण्यासाठी तहसीलदार करंगळे यांच्याकडे आपबिती कथन केली व नागरिकांच्या समस्या बाबतही तहसीलदार यांना माहिती देऊन याबाबत सहकार्य करण्याची मागणी केली. त्यानंतर नायब तहसीलदार करंगळे यांनी सदर कर्मचाऱ्यांना सूचना दिल्यानंतर काम मार्गी लागल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# बेकायदेशीर बांगलादेशी लाभार्थी तात्काळ शोधा अन् त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करा, फडणवीस सरकारचे आदेश

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून राज्यात रोजगार मिळवण्यासाठी येणाऱ्या बांगलादेश घुसखोरांची संख्या वाढली आहे. त्यामुळेच आता सरकारने कल्याणकारी योजनांचा बेकायदेशीरपणे राज्यात वास्तव्य करणारे बांगलादेशी लाभ घेत असल्यास ते ओळखण्यासाठी महाराष्ट्र सरकारने विविध विभागांना पडताळणी कागदपत्रांची, विशेषत: ओळख, निवासस्थान आणि लाभांच्या हक्कांशी संबंधित कागदपत्रांची छाननी करण्याचे निर्देश दिले आहेत.

'त्या' व्यक्तींना काळ्या यादीत टाकले जाणार : राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक संसाधनांच्या गैरवापराबद्दल वाढत्या चिंता लक्षात घेता शुक्रवारी जारी केलेल्या सरकारी निर्णयात विभागांना बनावट किंवा फेरफार केलेल्या कागदपत्रांचा वापर करून सरकारी प्रमाणपत्रे मिळवणाऱ्या व्यक्तींची नोंद तपासून दप्तरी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. एकदा ओळख पटल्यानंतर या व्यक्तींना काळ्या यादीत टाकले जाणार आहे आणि सरकारी संस्थांमध्ये पुढील गैरवापर रोखण्यासाठी त्यांची माहिती विभागीय वेबसाइटवर सार्वजनिकपणे उपलब्ध करून दिली जाणार आहे.

फौजदारी खटला चालवला जाणार : वैयक्तिक कल्याणकारी योजनांअंतर्गत लाभ मिळवणाऱ्या अर्जदारांना आता त्यांच्या भारतीय नागरिकत्वाची खातरजमा करणाऱ्या घोषणापत्रांवर स्वाक्षरी करावी लागणार आहे. तसेच बनावट कागदपत्रांद्वारे वास्तव्य करीत असल्यास खोटा दावा किंवा फौजदारी खटला चालवला जाणार आहे.

# शेतकरी नेते रविकांत तुपकर मातृतिर्थ सिंदखेडराजा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर

## सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देऊन दुबार पेरणीसाठी ही मदत करावी, अन्यथा सरकारच्या मानगुटीवर बसून नुकसान भरपाई घेऊ





**दैनिक आपला विदर्भ**

**सिंदखेड राजा/प्रतिनिधी :** तालुक्यात गत दोन दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी उध्वस्त झाला आहे. शेतात पाणीच पाणी झाली असून विहिरी खचल्या आहेत.जमिनी व जमिनीतील माती वाहून गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यावर आभाळ कोसळले असून दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे मायबाप सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देऊन दुबार पेरणीसाठी ही मदत करावी, अन्यथा सरकारच्या मानगुटीवर बसून नुकसान भरपाई घेऊ, असा इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी तालुक्यातील झोटिंगा गावात नुकसानग्रस्त भागाची पाहणी केल्यानंतर माध्यमांशी बोलताना दिला. यावेळी तुपकर म्हणाले की, गत दोन दिवसापूर्वी सिनखेडराजा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे हजारो हेक्टर वरील जमिनी खरडून गेल्या आहेत.

जुटिंगा या गावांमध्ये मी पाहणी केली असता विहिरी खचलेल्या आहेत. शेती वाहून गेली आहे. शेतातील मातीही पुरात वाहून गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. तीन वर्षापासून सरकार सोयाबीनला व शेतीमालाला भाव देत नाही. सध्या शेतकरी हा अभिमन्यू सारखा चक्रव्यूहात अडकला आहे.बँक कर्ज देत नाही, शेतीमालाला भाव नाही. सरकार कर्जमुक्ती करायला तयार नाही. अशा अनेक संकटाने शेतकरी हतबल झाला आहे.

२८ जून रोजी तालुक्यातील जुटिंगा गावातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली असता जमिनीतील व डोळ्यातील पाणी सारखेच असल्याचे दिसून आले आहे. मायबाप सरकारने शंभर टक्के नुकसान भरपाई द्यावी, शेतकऱ्यांनी हिम्मत न हरता नुकसान भरपाई मिळवण्यासाठी संघर्ष करावा, शासनाने ही तात्काळ नुकसान भरपाई द्यावी. अन्यथा सरकारच्या मानगुटीवर बसून शेतकऱ्यांना सोबत घेऊन नुकसान भरपाई घेऊ, असा इशारा शेतकरी नेते रविकांत उपकर यांनी सरकारला दिला.

यावेळी त्यांच्यासोबत परिसरातील शेतकरी तसेच इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

### शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज

लोणार तालुक्यात ढगफुटीसदृश पाऊसाने शेतीचे प्रचंड नुकसान झाले, त्याची पाहणी करण्याकरिता आज दौरा केला. मोठ्या प्रमाणात येथे शेतपीके वाहून गेली आहेत, विहिरी जमीनदोस्त झाल्या आहेत, जमिनी अक्षरशः खरडून गेल्या आहेत. शेतकऱ्यांवर आता दुबार नाही तर तिबार पेरणीची वेळ आली आहे. लोणार व सिंदखेडराजा तालुक्यातील झोटिंगा, देऊळगाव कोळ, कुंभेफळ, महारचिकना,ब्राम्हण चिकना, खापरखेड,वडगाव तेजन, पार्डी सिरसाट, यासह अन्य गावांचा दौरा करत परिसरातील शेतांची पाहणी केली. नुकसानीने खचलेल्या शेतकऱ्यांना आधार दिला. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी आणि सत्ताधारी नेत्यांनी इथे येऊन फक्त फोटोसेशन न करता नुकसान भरपाईसाठी ताबडतोब मुंबईत तळ ठोकून बसावे, आणि पिडीत शेतकऱ्यांना आठवडाभरात मदतीची व्यवस्था करावी. आता शेतकऱ्यांच्या सहनशक्तीचा केंव्हाही स्फोट होऊ शकतो, एवढी भीषण परिस्थिती लोणार, मेहकर आणि सिंदखेडराजा तालुक्यात उद्भवली आहे. त्यामुळे कोरडी आश्वासने देण्याऐवजी या शेतकऱ्यांना दुबार पेरणीची व्यवस्था तसेच १०० टक्के नुकसान भरपाई मिळावी, यासाठी सगळ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पान १ वरून...

### ठाकरे बंधू एकत्र

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शासन निर्णयाची होळी करत निषेध व्यक्त केला जाणार आहे. तर राज्यभरात शासन निर्णयाची होळी करत निषेध व्यक्त करण्याचा सूचना उद्धव ठाकरे यांनी दिल्या आहेत. हिंदीसक्तीविरोधात पाच जुलैला होणाऱ्या मोर्चात सहभागी होण्यासाठी मनसेकडून सामान्य मुंबईकरांना हाक दिली जाणार आहे. मनसेकडून मुंबईची लाईफ लाईन असलेल्या लोकल ट्रेनमध्ये जाऊन मुंबईकरांना आवाहन केलं जाईल. आज दुपारी १२ वाजता मनसे नेते संदीप देशपांडे दादर स्थानकात जाऊन प्रवाशांना आवाहन करणार आहेत. लोकलने प्रवास करणाऱ्यांनीही या मोर्चात सहभागी व्हावं असं आवाहन मनसेनं केलंय. दोघे ठाकरे बंधू मोर्चासाठी एकत्र येतायत याचा सगळ्यांना आनंद आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येऊन मोर्चाचं नेतृत्व करतील, असंही संजय राऊतांनी सांगितले. मुंबईवर मराठी माणसांचा झेंडा फडकवायचा असेल तर बाळासाहेबांचे विचार पाळावे लागतील. मराठी शक्तींनी एकत्र यावं, असं आवाहन संजय राऊतांनी केलं. तसेच याआधी मनसे–शिवसेना नेते एकमेकांना भेटत नव्हते. रस्ते बदलायचे. आता मराठीसाठी एकत्र येतायत, असंही संजय राऊतांनी सांगितले.

### भाजपला मिळणार

आपल्या नवीन राष्ट्रीय अध्यक्षांची घोषणा करण्याची शक्यता आहे. नवीन राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीनंतर पंजाब आणि दिल्लीला त्यांचे नवीन प्रदेशाध्यक्ष मिळतील. गुजरात आणि उत्तर प्रदेशसाठी घोषणा ४ ते ११ जुलै दरम्यान होऊ शकतात. भाजपचे केंद्रीय नेतृत्व शक्य तितक्या लवकर संघटनात्मक निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा विचार करत आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित आहे. हे अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे, ज्यामध्ये अनेक वादग्रस्त मुद्द्यांवर चर्चा होतील.

### छत्रपती संभाजी नगरमध्ये

करून त्यांच्या सुट्ट्या भागाचा पुनर्वापर होणार नाही, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावण्यात यावी. यासाठी नवे धोरण बनवण्यात आले. सदर धोरण महाराष्ट्र शासनाने सन. २०२३ मध्ये स्वीकारले असून ऑटोमोटिव्ह इंडस्ट्रि स्टॅंडर्डच्या अटी शर्तीनुसार स्क्रॅपिंग केंद्राला मान्यता देण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार एसटी महामंडळाला देखील राज्यात ३ ठिकाणी अशा प्रकारचे स्क्रॅपिंग सेंटर उभारण्याची परवानगी मिळाली असून त्यापैकी पहिले आणि राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे असलेल्या एसटी महामंडळाच्या १०० एकर जागेवर सार्वजनिक– खाजगी भागीदारीतून उभारले जाणार आहे. भविष्यात सर्वाधिक वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्याची विल्हेवाट लावणारे सर्वात मोठे सेंटर एसटीच्या माध्यमातून उभाले जाणार असून एक नवा उत्पन्नाचा स्त्रोत यातून निर्माण होईल.

### ११ वी प्रवेशाची पहिली

मात्र, आजच यादी जाहीर झाली असून १ ते ७ जुलै दरम्यान मिळालेल्या कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठीचा वेळ दिला आहे. दहावी बोर्ड परीक्षा निकाल जाहीर होऊन दीड महिना झाला अजूनही प्रवेशाच्या प्रतीक्षेत १२ लाख ७१ हजार विद्यार्थी आहेत. दरम्यान, विद्यार्थ्यांनी https://mahafyjcadmissions.in या वेबसाईटवर जाऊन आपली गुणवत्ता यादी पाहून प्रवेशाचा निर्णय घ्यावा राज्याच्या दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल १३ मे रोजी जाहीर झाला. निकाल जाहीर होऊन जवळपास आता दीड महिना होत आलाय. मात्र, अजूनही दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा अकरावीमध्ये प्रवेश झालेला नाही. विद्यार्थी अजूनही पहिल्या गुणवत्ता यादीच्या प्रतीक्षेत आहेत. आज अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची पहिली गुणवत्ता यादी जाहीर होणार होती. या पहिला गुणवत्ता यादीची सर्व विद्यार्थ्यांना प्रतीक्षा आहे. मात्र, आज जाहीर होणारी पहिली गुणवत्ता यादी आता ३० जून रोजी जाहीर होणार आहे. शिक्षण संचालनालयाने याबाबतचे परिपत्रक जारी केलं आहे.

### हभप नारायण महाराज

गावी अखेरचा श्र्वास घेतला. वयाच्या नवव्या वर्षापासून त्यांनी वारकरी संप्रदायाची धुरा खांद्यावर घेतली. त्यांनी ६० वर्ष सलगपणे पंढरीची वारी केलीय. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर त्यांनी कीर्तनातून वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार करत सेवा बजावली.वारकरी संप्रदायातील त्यांचे 'विरह अभंग' खूप प्रसिद्ध आहेत. दरम्यान, उद्या रविवार सकाळी १० वाजता त्यांच्यावर व्याळा या त्यांच्या मूळगावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. महाराष्ट्रभरातून उद्या त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी वारकरी मंडळी उपस्थित राहणार आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# शेतकऱ्यांना भरघोस मदत करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा; केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची माहिती

## मेहकर व लोणार तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी






**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर व लोणार तालुक्यात दोन दिवसापूर्वी झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने शेतीची प्रचंड हानी झाली आहे पेरणी केलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त भागाची केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी पाहणी करून शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी मेहकर व लोणार तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना सरसकट आणि भरघोस मदत मिळवून देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही माध्यमांशी बोलताना दिली. मेहकर व लोणार तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली.यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत झालेल्या नुकसान बद्दल माहिती जाणून घेतली. २५ व २६ जून दरम्यान झालेल्या पावसाने प्रचंड नुकसान झाली असून तब्बल २५० किलोमीटर पावसाची नोंद झाली असल्याचे त्यांनी सांगितले अनेक मंडळात अतिवृष्टी झाली असून नदी नाले तुडूंब भरून वाहले.त्यामुळे जमिनी खरडून गेल्या. ठिंबक सिंचन स्पिंकलर सिंचन सुद्धा साहित्य सुद्धा वाळून गेले आहे.सोलर पॅनलचे नुकसान झाले आहे.या सर्व नुकसानीचा मोबदला म्हणून तात्काळ आर्थिक मदत करण्यासाठी शासनाला आदेश दिले आहेत. कोणालाही या नुकसान भरपाई मधून वगळण्यात येऊ नये, अशा सूचना सुद्धा शासनाला दिल्या आहेत. असे माहिती केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली त्याचबरोबर कांचन नदीचे खोलीकरण करण्यासंदर्भात सुद्धा मदत करण्यात येईल. मात्र नदी बाजुला असलेल्या शेतकऱ्यांचे संमतीपत्र आवश्यक आहे.संमती पत्राविना नदी खोलीकरण आणि रुंदीकरण करता येणार नाही, असे मतही यावेळी जाधव यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर दुबार पेरणीचे संकट आलेल्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## संक्षिप्त...

### भाजपा प्रदेश प्रवक्ते विनोद वाघ यांची पुरग्रस्त भागाची पाहणी



**दैनिक आपला विदर्भ**

**महारचिकना/प्रतिनिधी :** लोणार तालुक्यातील अंजनी खुर्द महसूल मंडळात दिनांक २६ जून रोजी झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे बऱ्याच शेतकरी बांधवांचे शेतमालाचे तसेच जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले त्या नुकसानग्रस्त भागाची पाहणी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते विनोद वाघ यांनी पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळेल असे अस्वस्थ केले तसेच संबंधित नुकसानीची माहिती स्वतः महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना देणार असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी विनोद वाघ त्यांच्यासोबत भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप, संतोष रणमळे, सरपंच शिवाजी ढाकणे, सुभाष पाटील ढाकणे, रामेश्वर काळुसे, गजानन नागरे, गणेश पाटील,प्रदिप ढाकणे ,गजानन ढाकणे सह महारचिकना येथील नुकसान ग्रस्त शेतकरी उपस्थित होते.

### आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थाचा गैरवापर व बेकायदेशीर वाहतुक विरोधी दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती

**वाशीम/प्रतिनिधी :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा विधिज्ञ संघाच्या संयुक्तवतीने २६ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थाचा गैरवापर व बेकायदेशीर वाहतुक विरोधी दिनानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशीम येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरूवात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या गीताने करण्यात आली. अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.व्ही. हांडे यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. जी. चौखंडे यांनी उपस्थितांना अंमली पदार्थाचा गैरवापर व बेकायदेशीर वाहतुक या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला कृषी उत्पन्न बाजार समिती निरिक्षक वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अड. प्रशांत सावरकर यांनी उपस्थितांना उसतोड व इतर कामगारविषयक कायदे या विषयावर तर जिल्हा विधी संघाचे उपाध्यक्ष अड. वैभव तिफणे यांनी उपस्थितांना सार्वजनिक उपयोगिता सेवा या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक मुख्य न्यायरक्षक अड. परमेश्वर शेळके यांनी केले. शेळके यांनी नालसा पोर्टलबद्दल माहिती दिली. न्यायालय येथील न्यायनिर्णय मराठी भाषेत उच्च न्यायालय मुंबई यांचे अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून जास्तीत जास्त नागरीकांनी लाभ घ्यावा. नालसा हेल्पलाईन क्रमांक १५१०० आणि नालसा जनजागृती करण्यात आली. तसेच बालविवाह होत असल्यास माहिती देण्यासाठी टोल फ्री क्रमांक १०९८ उपलब्ध असल्याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. उपस्थितांचे आभार जिल्हा वकील संघाचे कोषाध्यक्ष अड.डी.डी. गुडदे यांनी मानले. कार्यक्रमाला शेतकरी, व्यापारी, कर्मचारी, कृषी उत्पन्न बाजार समितीतील हमाल यावेळी उपस्थित होते.

### शेफाली जरीवालाच्या निधनानंतर श्वानासोबत फिरताना दिसला तिचा नवरा; परागच्या हातात तिचा फोटो अन..

**मुंबई/प्रतिनिधी :**अभिनेत्री शेफाली जरीवालाच्या निधनाच्या काही तासांनंतर तिचा नवरा पराग त्यागीची पहिली झलक पाहायला मिळाली आहे. तो आज शनिवारी मुंबईत त्याच्या पाळीव श्वानाला अर्थात सिम्बाला घेऊन बाहेर पडताना दिसला. त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावक व्हायरल होतोय. ज्यात परागला त्याच्या श्वानासोबत स्पॉट करण्यात आलं.

# आमदार श्वेता महाले पाटील वारकऱ्यात रमल्या

## महिला भाविकांसोबत खेळली फुगडी




**दैनिक आपला विदर्भ**

**फलटण/प्रतिनिधी :** माझे जिवीची आवडी, पंढरपुरा नेईन गुढी'', असे म्हणत विठूनामाचा गजर करत पंढरीच्या दिशेने जाणाऱ्या श्री धारेश्वर संस्थान पंचक्रोशीतील वारकरी बांधवांच्या दिंडीचा मुक्काम चिखली मतदारसंघातील फलटण येथे झाला. यावेळी मतदारसंघाचे आमदार श्वेता महाले पाटील यांनी पांडुरंगाच्या भक्तांमध्ये रमण त्यांच्यासोबत संवाद साधला एवढेच नव्हे तर महिला भाविकांसोबत फुगडी खेळचा आनंदही घेतला. तसेच दिंडीतील भाविक भक्तांसोबत भोजन केले. संत ज्ञानोबारायांनीही अभंगात फुगडीचा उल्लेख केला आहे. वारीदरम्यान अनेक प्रकारच्या फुगड्या आणि विविध खेळ वारकरी खेळतात. त्यातून मिळणारी ऊर्जा घेऊन पंढरीची वाटचाल करतात. या वेळी लक्ष्मण महाराज सोळंकी, सहदेव बुवा परिहार, युवा कीर्तनकार सागर महाराज भोंडे, संजय महाराज खरात, राजू महाराज भोंडे, ऋषिकेश महाराज महाले, यश महाराज खंदारे, वेदांत महाराज सोळंकी, शिवनारायण बुवा भंदर्गे, शिवाभाऊ सोळंकी, दामू अण्णा उबाळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



### नवाजुद्दीन सिद्दीकीला आय एम नॉट अॅन अॅक्टरसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा मिळाला पुरस्कार

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकीला आय एम नॉट अॅन अॅक्टर या चित्रपटातील त्याच्या उत्कृष्ट अभिनयासाठी न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हल मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला आहे. या चित्रपटामध्ये स्वत:ची ओळख, स्वरुप आणि मनातील गोंधळ दाखवला गेला आहे. आय एम नॉट अॅन अॅक्टर चित्रपटामध्ये नवाजुद्दीननं आपली भूमिका अत्यंत साध्या पद्धतीनं साकारली आहे. या चित्रपटाचे कौतुक प्रेक्षक आणि समीक्षक करत आहेत. आय एम नॉट अॅन अॅक्टर चित्रपटाची सखोल कथा आणि दमदार अभिनय हा अनेकांना आवडला आहे. चित्रपटातील नवाजुद्दीन सिद्दीकीचे पात्र हे खूप प्रभावी आहे. हा चित्रपट कमी बजेटमध्ये तयार करण्यात आला आहे.

आय एम नॉट अॅन अॅक्टर हा चित्रपट अधिकृतपणे न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हल मध्ये दाखवण्यात आला, ज्यामुळं नवाजुद्दीन सिद्दीकीचा आंतरराष्ट्रीय महोत्सवांशी असलेला संबंध आणखी दृढ झाला. जगभरातील महोत्सवांमध्ये त्यांच्या सखोल कथाकथन आणि दमदार अभिनयासाठी त्यांचे चित्रपट अनेकदा निवडले जातात. नवाजुद्दीन सिद्दीकीचा अभिनय हा अनेकांना आवडतो. चित्रपट मोठ्या बजेटचा असो किंवा छोट्या नवाज प्रत्येक पात्रात जीव टाकतो. गेल्या काही वर्षामध्ये नवाजुद्दीन सिद्दीकीनं दमदार भूमिका चित्रपटांमध्ये केल्या आहेत, ज्यामुळं त्याच्या चाहत्यांमध्ये देखील वाढ झाली आहे.


# पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्यांतर्गत मिळणार बक्षीस; नागरिकांचा सहकार्य करावे : डॉ. कावरखे

## कन्याभ्रूणहत्या रोखण्यासाठी मोठे पाऊल : डिकॉय केससाठी मदत करणाऱ्या गर्भवती महिलेस मिळणार १ लाख रुपयांचं बक्षीस

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** कन्याभ्रूण हत्येचा वाढता धोका आणि लिंग गुणोत्तर बिघडण्याच्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यात एक महत्त्वाची योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी जर लिंग निदान प्रतिबंधक व प्रसवपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी कायदा) किंवा महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियम (एमटीपी कायदा) अंतर्गत अनधिकृत गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांविरोधात खात्रीशीर माहिती दिली, आणि त्यामुळे गुन्हा उघडकीस आला. तर, संबंधित माहितीदाराला रु. १ लक्ष रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अनिल कावरखे यांनी दिली. २७ जुन रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयात जिल्हा सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली.

यावेळी डॉ.श्री.कावरखे बोलत होते.यावेळी समिती अध्यक्षा डॉ.अल्का मकासरे, डॉ. जे.एस.बाहेती, डॉ. निता काचर्डे, डॉ.जया बिबेकर, अड. जी.डी. गंगावणे, डॉ.उज्वला गिऱ्हे आदींची उपस्थिती होती.या समितीचा उद्देश लिंग निवडीस प्रतिबंध घालणे, कन्याभ्रूण हत्या थांबवणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे हा आहे. पीसीपीएनडीटी कायदा व एमटीपी कायद्यांतर्गत डिकॉय केस यशस्वी झाल्यानंतर तसेच न्यायालयीन प्रकरण दाखल झाल्यानंतर डिकॉय केस करीता मदत करणाऱ्या गर्भवती महिलेस सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत एक लक्ष बक्षीस देण्यात येणार आहे.गर्भधारणेपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा किंवा वैद्यकीय गर्भपात कायद्यान्वये राबविण्यात आलेल्या यशस्वी कारवाईबाबत माहिती देणाऱ्या नागरिकास रु. १ लक्ष बक्षीस देण्यात येते.ही माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येते व संबंधिताची ओळख जपली जाते.



कन्याभ्रूणहत्या ही केवळ कायद्याचा विषय नसून, ती सामाजिक चेतनेची गरज आहे.लिंग निदानावर बंदी घालणारा कायदा आणि सरकारची बक्षीस योजना ही समाजात जागृती निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे. नागरिकांनी पुढाकार घेऊन अशा बेकायदेशीर कृत्यांची माहिती प्रशासनाला दिल्यास केवळ एका मुलीचा जीव वाचवला जात नाही, तर संपूर्ण समाजाचा दृष्टिकोन बदलतो. जिल्हा प्रशासन या मोहिमेला अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी कटिबद्ध आहे.

**–बुवनेश्वरी एस.,**
**जिल्हाधिकारी वाशीम.**

कन्याभ्रूणहत्या थांबवण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. बक्षीस योजनेद्वारे जनजागृती होऊन लिंगनिषेधास प्रतिबंध घालण्यास मदत होईल. प्रशासन या अभियानासाठी सज्ज आहे. नागरिकांनी सुध्दा प्रशासनास सहकार्य करावे.

**–वैभव वाघमारे,**
**जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी वाशीम.**

लिंग निवड चाचण्या आणि कन्याभ्रूणहत्या ही गंभीर आरोग्यविषयक आणि सामाजिक समस्या आहे. वाशिम जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणारी बक्षीस योजना ही या समस्येच्या मुळाशी जाऊन उपाय करणारी आहे. नागरिकांनी जर अशा बेकायदेशीर चाचण्यांची माहिती दिली, तर प्रशासनाकडून त्वरित कारवाई केली जाईल. ही योजना केवळ गुन्हे उघडकीस आणण्यापुरती मर्यादित नसून, ती स्त्री भ्रूणाच्या संरक्षणासाठी एक शक्तिशाली माध्यम ठरणार आहे. प्रत्येक नागरिकाने या अभियानात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

**–डॉ. अनिल कावरखे,**
**जिल्हा शल्य चिकित्सक वाशीम.**

# शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देणार

## आम्ही हाडामासांचे शेतकरी, कोणी कितीही नौटंकी केली तरी शेतकरी त्यांना ओळखू आहेत. डॉ संजय रायमूलकर

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर व लोणार परिसरात गत दोन दिवसांपूर्वी झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीची केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर यांनी २८ जून रोजी पाहणी केली. त्यानंतर माजी आमदार संजयने रायमुलकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, आम्ही हाडामासांचे शेतकरी असून कोणी कितीही नौटंकी केली.तरी, शेतकरी त्यांना ओळखू आहेत. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही यावेळी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी दिली. माजी आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, आम्ही हाडा मांसाचे शेतकरी असून आम्हाला शेतीशी प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे.जान आहे.त्यामुळे रस्त्यावरून नव्हे तर शेतकऱ्यांच्या बांधावर जात शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आज केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह मेहकर व लोणार तालुक्यात नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यात आली आहे. पाहणी दरम्यान शेतकऱ्यांच्या व्यथा ह्या प्रचंड असल्याचे दिसून आले असून शेतातील पिक वाहून गेली आहे जमिनीतील गाळही वाहून गेल्याने शेतीही धोक्यात आली आहे. अनेक ठिकाणी पुराचे पाणी शेतात गेल्याने पेरणी केलेले शेत खता बियाण्यासह वाहून गेले आहे. परिणामी, प्रचंड नुकसान झाली आहे. शेतकऱ्यांना आम्ही वाऱ्यावर सोडणार नसून जास्तीत जास्त मधून मदत मिळवून





देण्यासाठी प्रयत्न करणार आहे शासनाला सुद्धा मंत्रिमंडळाने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याचबरोबर जमीन खरडून गेलेल्या पकाचे नुकसान झालेल्या तुझे नामे करण्याचे निर्देश दिले आहे. भविष्यातही शेतकऱ्यांना मदत करणार आहोत.आम्ही हाडामासांचे शेतकरी असून रस्त्यावरून नवे तर, शेतातील बांधावर जाऊन पाहणी केली आहे. शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आहेत.कोणी कितीही नोटंकी केली तरी लोक त्यांना आता ओळखून आहेत. मी शेतकरी कुटुंबातील असल्याने शेतकऱ्यांची समस्या जाणून घेतो, मेहकर लोणार तालुक्यातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळून देण्यासाठी सुद्धा शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याची माहिती माजी आमदार संजय रायमुलकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

## सलग दुसऱ्या दिवशी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव करणार दुष्काळग्रस्त भागाचा दौरा

### बांधावर जाऊन देणार शेतकऱ्यांना आधार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेती आणि शेतकरी यांच्या सोबत जिव्हाळ्याचं नातं असलेले केंद्रीयमंत्री भुमिपुत्र प्रतापराव जाधव हे सलग दुसऱ्या दिवशी अतिवृष्टीने बाधित झालेल्या भागाची पाहणी करून शेतकऱ्यांना आधार देणार आहेत.

२६ जून रोजी बुलढाणा जिल्ह्यातील लोणार आणि मेहकर तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने या दोन्ही तालुक्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले जमिनी खरडून गेल्यात या संदर्भाची माहिती मिळाल्यानंतर केंद्रीय मंत्री भूमिपुत्र प्रतापराव जाधव हे २७ ला दिल्लीवरून आल्यानंतर २८ जून रोजी त्यांनी लोणार आणि मेहकर तालुक्यातील तालुक्याचा दौरा केला नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली शेतकऱ्यांसोबत संवाद साधून त्यांना धीर दिला . शासनाकडून सर्वतोपरी मदत मिळवून देण्याची ग्वाही दिली व प्रशासनालाही तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश दिले सलग दुसऱ्या दिवशी उद्या २९ जूनला





मेहकर तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाचा दौरा करणार आहेत सकाळी १० वाजता केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे मेहकर तालुक्यातील फर्दापुर गावापासुन ते आपल्या दौऱ्याला सुरुवात करणार आहे . त्यांच्यासोबत माजी आमदार संजय रायमुलकर शिवसेनेचे पदाधिकारी आणि प्रशासनातील अधिकारी उपस्थित राहणार आहेत

सकाळी १०.३० वा. :- कंबरखेड ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी.

सकाळी ११.०० वा. :- गौंढाळा ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी.

सकाळी ११.३० वा. :- भालेगांव ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी.

दुपारी १२.०० वा. :- पाचला ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी.

दुपारी १२.३० वा. :- रायपुर ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी.

दुपारी ०१.०० वा. :- सावत्रा ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी.

दुपारी ०१.३० वा. : – नायगांव दत्तापुर ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी.

दुपारी ०२.०० वा. मोसंबेवाडी ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी.

दुपारी ०२.३० वा. :- जानेफळ ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी.

दुपारी ०३.०० वा. :- उटी ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी.

दुपारी ०३.३० वा. :- वरवंड ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी.

दुपारी ०४.०० वा. : – देऊळगांव साकर्षा ता.मेहकर येथे आगमन व अतिवृष्टी, नुकसानग्रस्त भागांची पाहणी. त्यांनतर सोयीनुसार ''मातोश्री'' शिवाजी नगर मेहकरकडे प्रस्थान करणार आहे

## शिंदे गटाच्या माजी नगरसेवकाविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा; महिलेने सांगितले नेमके काय घडले?

**ठाणे/प्रतिनिधी :** शिवसेना शिंदे गटाच्या माजी नगरसेवकावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे दोन महिन्यापूर्वी उगले यास एका महिलेने पक्षाच्या कार्यक्रमानंतर भररस्त्यात चोप दिला होता. शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक मोहन उगले याच्यावर महिलेचा छळ करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी कल्याण बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनं कल्याणमधील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

मोहन उगले वारंवार पीडित महिलेला वाईट नजरेने पाहून तिचा मानसिक छळ करत असल्याचा आरोप महिलेने केला आहे. तसेच, मला येता–जाता वाईट नजरेने पाहतात आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांना धरुन माझ्यावर दबाव टाकतात. मला आत्महत्या करण्यास उगले यांच्याकडून प्रवृत्त केलं जात असल्याचेही पीडित महिलेने म्हटलं आहे. याप्रकरणी, महिलेच्या फिर्यादीवरुन कल्याण बाजार पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बिजोत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात महाबीजने भरलं 'अनुदानाचे सोनं'

### ८१४ बिजोत्पादकांच्या खात्यात २ कोटी २८ लक्ष ७९ हजार ८३८ रुपयांचे थेट अनुदान



**वाशीम/प्रतिनिधी :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा गळीत धान्य व कडधान्य योजने अंतर्गत खरीप व रब्बी २०२३–२४ हंगामातील उत्पादित बियाण्यास महाबीज मार्फत ऐन पेरणी हंगामात बिजोत्पादकांना अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा गळीत धान्य योजने अंतर्गत सोयाबीन, जवस व मोहरी या पिकास तर राष्ट्रीय अन्न सुरक्षा कडधान्य योजने अंतर्गत उडीद व हरबरा इत्यादी पिकांच्या नवीन वाण अनुदानास पात्र आहेत.राष्ट्रीय अन्न सुरक्षा गळीतधान्य योजने अंतर्गत सोयाबीन पिकास रु. ६६१ प्रती क्विंटल व मोहरी आणि जवस पिकास रु. १०५१ प्रती क्विटल तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा कडधान्य योजने अंतर्गत उडीद पिकास रु. ३७०० प्रती क्विंटल व हरबरा पिकास रु. २५५४ प्रती क्विंटल अशी एकूण रक्कम रुपये २२८.७९ लक्ष रुपये महाबीज कडून बिजोत्पादकांना अनुदानाची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.खरीप व रब्बी २०२३–२४ हंगामास ज्या बिजोत्पादाकांचा नवीन वाणाचा बिजोत्पादन कार्यक्रम बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या अंतिम अहवालात पात्र ठरलेला आहे. अश्या बिजोत्पादकांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे. यामुळे नवीन वाणाच्या बियाणे उत्पादनास जिल्ह्यामध्ये प्रोत्साहन मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.जिल्ह्यातील बियाणे उत्पादक शेतक–यांना प्रोत्साहन देणे, शाश्वत उत्पादनात वाढ करणे, जिल्ह्यातील बिजोत्पादक शेतक–याने नवीन वाणाचे उत्पादित केलेल्या बियाण्याचा वापर जास्तीत जास्त शेतक–यांनी करून आपली उत्पादकता व उत्पादन वाढवावे, असे महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक एस. एस. सावरकर यांनी कळविले आहे.

## विविध वृत्त...

### वादळी पावसामुळे सोलर प्लेटचे नुकसान



दैनिक आपला विदर्भ

**महारचिकना/प्रतिनिधी :** लोणार तालुक्यात गुरुवारी दिनांक,२६ रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह शेतीपिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. यावेळी आलेल्या वादळात महारचिकना येथील शेतकरी शिवाजी भावराव सोनुने यांच्या( गट नं १३१) शेतातील विहिरीवर बसविलेल्या सोलर प्लेटच उडुन पडल्या. यामुळे सदर शेतकर्याचे नुकसान झाले असून परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे देखील नुकसान झाले आहे

### तरोड्याजवलील बस दुचाकीच्या अपघातात बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**दारव्हा/प्रतिनिधी :** तालुक्यातील तरोडा गावाजवळ रविवार, दि. २२ जून रोजी भीषण अपघात घडला होता. एसटी बस व दुचाकी यांच्यात झालेल्या जोरदार घडकेत दुचाकीवरील दोघे युवक गंभीर जखमी झाले होते. त्यापैकी एक अमोल भारत राठोड हा उपचारादरम्यान मरण पावला व दुसरा गंभीर जखमी झाला होता.प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी कारण रामराव चव्हाण वय ३३ वर्ष, रा. लाखखिंड ता. दारव्हा यांचा साळा मृतक नामे- अमोल भारत राठोड वय २५ वर्ष रा. लाखखिंड हा त्याची मोसा वाहन क्र एमएच-२९ बि.डब्लु. ०१३६ ने दारव्हा वरुन लाखखिंड येथे येत असताना यातील आरोपी बस वाहन क्र एम एच- १२३ सी.यु. ८२६६ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतक याचे मोसा वाहनास ठोस मारुन आपघात केल्याने मृतक हा गंभीर जखमी होवुन मरण पावला. तसेच मृतक याचे मोसावर सोबत असलेला बाबु मोतीराम शेरे हा जखमी झाला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन अप क्र. ४७२/२५ कलम २८१, १०६(१), १२५(ब) भान्यासं प्रमाणे सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.पुढील तपास दारव्हा पोलीस करीत आहे.

### भारतीयांचे खरे पूर्वज कोण? आपला डीएनए कोणाशी जुळतो? सापडले ४००००० वर्षापूर्वीचे कनेक्शन

**मुंबई/प्रतिनिधी :** आजच्या भारतीयांच्या आनुवांशिक रचनेचा उगम कुठे आहे? या प्रश्नासंदर्भातील महत्त्वपूर्ण शोध पूर्ण झाला असून त्यासंदर्भातील अहवाल समोर आला आहे. विशेष म्हणजे दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेने अर्थात 'एम्स'ने दोन परदेशी विद्यापिठांच्या सहाय्याने केलेल्या संशोधनामधून भारतीयांचे जणूकीय मूळ कुठे आहे हे शोधून काढण्यात संशोधकांना यश आले आहे.भारतीयांच्या उत्पत्तीची पाळंमुळं ही नवपाषाणकालीन इराणी शेतकरी, युरेशियन स्टेपीमधील पशुपालक आणि दक्षिण आशियातील आदिम शिकारी या तीन मानवसमूहांपासून झाली आहे, असे दिल्लीतील 'एम्स' आणि कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले येथील शास्त्रज्ञांच्या संयुक्त संशोधनातून समोर आले आहे.

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जावुन केली नुकसानीची पाहणी; शेतकऱ्यांना दिला आधार

### अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतजमिनीचे पंचनामे करण्याचे दिले निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतजमिनीची पाहणी आज केंद्रीय आयुष आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केली शेतकऱ्यांना आधार देत नुकसानीचे तात्काळ जमिनीचे पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला दिलेत

२६ जून रोजी बुलढाणा जिल्ह्यातील लोणार आणि मेहकर तालुक्यामध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस झाला या अतिवृष्टीमुळे शेतात पाणी तुंबुन शेतकऱ्यांच्या शेत जमिनी खरडून गेल्या होत्या अनेक शेतकऱ्यांचे नुकसान या अतिवृष्टीमुळे झाले आहे शेतकऱ्यांच्या बंधावर जावुन नुकसानीची पाहणी आज २८ जुनला केंद्रीयमंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांनी केली बुलढाणा जिल्ह्यातील लोणार आणि मेहकर तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागांचा दौरा आज त्यांनी केला लोणार तालुक्यातील सुलतानपूर येथून त्यांनी आपल्या दौऱ्याला सुरुवात केली अंजनी, शारा, वेणी गुंधा, त्यानंतर मेहकर तालुक्यातील अंत्री देशमुख, डोणगाव, गोहेगाव, पांगरखेड,जनुना शेलगाव देशमुख, विश्वी, आणि घाटबोरी या भागात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव शेतकऱ्यांच्या बांधावर जावून केली शेतकऱ्यांसोबत संवाद साधुन त्यांना आधार दिला शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई कशी मिळेल या दृष्टिकोनातून राज्य सरकारकडे प्रयत्न करणार असल्याचे सांगितले . सोबतच नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना निर्देशित केले

